# प्रेसनोट दि. २०/०४/२०१९

## मंगळवार पेठ मध्ये जुगाराच्या अवैद्य धंद्यावर सामाजिक सुरक्षा विभागाने छापा टाकुन ३४ इसमांवर कारवाई

मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ. मनिषा झेंडे, सामाजिक सुरक्षा विभाग यांना बारणे रोड, मंगळवार पेठ, एच.डी.एफ.सी. बँकेसमोर, पुणे येथे जुगार चालु आहे. अशी बातमी मिळाल्याने सदर बातमीची खातरजमा करुन मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मनिषा झेंडे व सामाजिक सुरक्षा विभागा कडील विभागाकडील अधिकारी व कर्मचारी यांनी सदर ठिकाणी दि. १९/०४/२०१९ रोजी १६.१५ वा.चे सुमारास छापा टाकुन रोख रक्कम ३६,८६०/- व ३८ मोबाईल हॅन्डसेट किंमत रुपये ६८,४००/- तसेच किंमत रुपये १०,०००/- चे पंती पाकोली जुगाराचे इलेक्टोनिक दोन मशिन व किंमत रुपये १००/- चे दोन फ्लेक्स असा एकुण किंमत रुपये १,१५,३६०/- जुगाराच्या साधनासह मिळून आल्याने पाहिजे आरोपी नामे भिमाशंकर येरप्पा कुंभार, व जुगार खेळविणारे तसेच खेळणारे एकुण ३४ इसमांच्या विरुध्द समर्थ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर १२२/२०१९ महाराष्ट्र जुगार अधिनियम कलम १२ (अ) ४ व ५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच पुढील तपास समर्थ पोलीस स्टेशनकडे सुपुर्त केला आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.श्री. भानुप्रताप बर्गे, सपोआ, गुन्हे-२, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ.मनिषा झेंडे, मसपोनि अनिता खेडकर, मपोउनि योगिता कुदळे, पोउपनि अनंत व्यवहारे व प्रमोद म्हेत्रे, नितीन तरटे, नितीन तेलंगे, सचिन कदम, सुनिल नाईक, राजेद्र ननावरे, निलेश पालवे, संदीप गायकवाड, रुपाली चांदगुडे, ननिता येळे, गितांजली जाधव यांनी कारवाई केली आहे.